# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक
दिनांक-१0 जून २०१५

- **मुंबई विद्यापीठाची आशियाई झेप**
- **मुंबई विद्यापीठ महाराष्ट्रात अव्वल स्थानावर**
- **आशियातील सर्वोत्तम शिक्षण संस्थांच्या यादीत मुंबई विद्यापीठ**

मुंबई - आशियातील सर्वोत्तम शिक्षणसंस्थांच्या २०१५ च्या क्रमवारीत मुंबई विद्यापीठाने बाजी मारली आहे.आशियातील १५० विद्यापीठामध्ये मुंबई विद्यापीठाचा समावेश झाला असुन गतवर्षीच्या तुलनेत १३१ वरुन १२५ स्थानावर मुंबई विद्यापीठ पोहचले आहे.देशातील पारंपरिक ४ विद्यापीठापैकी मुंबई विद्यापीठ दुस-या क्रमांकावर पोहचले आहे,तर महाराष्ट्रातील विद्यापीठामध्ये मुंबई विद्यापीठ अव्वल स्थानावर आहे. ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणारे आणि देशाची ज्ञानविषयक गौरवशाली परंपरा आणि वाढता सामाजिक-आर्थिक प्रभाव पाहता मुंबई विद्यापीठाने ज्ञानदानाच्या या पवित्र कार्यात आपला मोलाचा ठसा उमटवला आहे.
क्वाकारेली सायमंड Quacquarelli Symonds (QS) यांनी प्रसिद्ध केलेल्या क्रमवारीत पहिल्या दीडशेमध्ये भारतातील पारंपरिक विद्यापीठामध्ये मुंबई विद्यापीठाचा समावेश झाला असून देशात दुस-या क्रमांकावर तर महाराष्ट्रात अव्वल स्थान टिकवून ठेवले आहे.

क्यूएस च्या अहवालानुसार,मुंबई विद्यापीठाने गेल्या पाच वर्षात भरीव कामगिरी केली आहे.मुंबई विद्यापीठाने अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सामंजस्य करार करत अनेक व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु केले आहेत.खेळ आणि सांस्कृतिक क्षेत्रातही मुंबई विद्यापीठाची कामगिरी अतुलनिय आहे.गेल्या पाच वर्षात विद्यापीठात १०४ टक्क्यानी पदवी आणि ११२ टक्क्यांनी पदव्युत्तर विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे.तर दुरस्थ शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या संख्येत १४७ टक्क्यांनी वाढ झालेली

आहे.एवढच नाही आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या जर्नल्स मध्ये १५६ टक्क्यांनी संशोधन पेपर्स मध्ये वाढ झाल्याचे नमुद करण्यात आले आहे.विद्यापीठाच्या १२ विभागांना अनेक राष्ट्रीय स्तरावच्या कार्यक्रमात मान्यता मिळाल्याचेही नमुद कऱण्यात आले आहे.विद्यापीठाशी सलंग्नित असलेले ८० हून अधिक प्राध्यापक हे विविध व्यावसायिक संस्थावर (बॉडीज) कार्यरत आहेत. तर गेल्या पाच वर्षात १८ राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्काराने येथील प्राध्यापकांना गौरन्वित करण्यात आल्याचेही अहवालात सांगण्यात आले आहे.

मुंबई विद्यापीठांने समाजाचे बौध्दिक आणि नैतिक शक्तीस्थान म्हणून गेल्या १५७ वर्षांत भरीव कामगिरी केली आहे.सामाजिक मुल्य आणि संधींची सतत वाढणारी जबाबदारी उत्साहाने वागवत देशाला विशेषतः महाराष्ट्र आणि मुंबई शहराला उत्तम गुणवत्ता दिली आहे. मुंबई विद्यापीठाच्या ७४० सलंग्नित महाविद्यालयातून जवळपास सात लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.पारंपारिक शिक्षणाबरोबर व्यवसायाभिमूख शिक्षणाची कास धरणा-या मुंबई विद्यापीठांने व्यवसायाभिमूख अभ्यासक्रम,नाविण्यपूर्ण शिक्षणक्रम,समाज महाविद्यालय,आदर्श महाविद्यालये सुरु केले आहेत.तर विद्यापीठाच्या उपकेंद्रामध्ये रोजगाराभिमूख अभ्यासक्रमाबरोबरच पाच वर्षीय एकात्मिक अभ्यासक्रम सुरु केले आहेत.सिंधूदुर्ग,रत्नागिरी,रायगड,ठाणे,मुंबई,आणि मुंबई उपनगर या ठिकाणी मुंबई विद्यापीठामार्फत विविध शिक्षणक्रम चालविले जातात.

उच्च शिक्षणाची जागतिक दिशा ओळखून मुंबई विद्यापीठाने जवळजवळ ५५ नविन शिक्षणक्रम सुरु केले आहेत,.जेणेकरुन भविष्यात मुंबई विद्यापीठात येणा-या विद्यार्थ्यांसाठी नाविण्यपूर्ण अभ्यासक्रमांचे शिक्षण उपलब्ध होईल.विद्यापीठ अनुदान आयोगाने संशोधनास वाव देण्यासाठी मुख्य आणि दुय्यम संशोधन प्रकल्पास प्रोत्साहन दिले आहे. विद्यापीठ आणि महाविद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षकांना नवीन तंत्रज्ञान उपलबध्द झाल्याने व त्याच्या मदतीने शिकवल्याने विद्यार्थ्यांची आकलन क्षमता आणि वैचारिक पातळी वाढते व त्याचा संशोधनास प्रोत्साहित करण्यासाठी विविध सोयी दिल्या जातात.त्याचा फायदा विद्यार्थी,शिक्षक आणि समाजाला नक्कीच होतो.

## मागील पाच वर्षाची आकडेवारी

| **देशातील विद्यापीठ** | | 2011 | 2012 | 2013 | 2014 | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| मुंबई विद्यापीठ | | 145 | 151 | 140 | 131 | 125 |
| दिल्ली विद्यापीठ | | 77 | 78 | 80 | 81 | 91 |
| कोलकाता विद्यापीठ | | 115 | 143 | 143 | 131 | 149 |
| पुणे विद्यापीठ | | 142 | 191 | 181 | 201 | 201 |

## कोट

( गेल्या पाच वर्षाच्या आकडेवारीवर लक्ष दिल्यास मुंबई विद्यापीठाची रॅकिंग सतत वाढत असल्याचे दिसुन येते ही नक्कीच स्वागतार्हय बाब असून यासाठी विद्यापीठ प्रशासनाचे बौध्दीक आणि प्रशासकिय कार्य महत्वाचे असून तेवढेच माझ्या विद्यार्थ्यांचे अविरत प्रयत्नही कारणीभूत आहेत. याच विकासाची कास धरणारे मुंबई विद्यापीठ येत्या काही काळात शंभरातही आपले स्थान निर्माण करेल असा आशावाद आहे.

-डॉ.राजन वेळूकर,कुलगुरु,मुंबई विद्यापीठ )

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)